# पुणे विद्यापीठ

# निवडणूक सूचना

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम २७(१)(एन), अन्वये व परिनियमामध्ये विहित केल्यानुसार विद्यापरिषदेने तिच्या सदस्यांमधून खालील तीन विद्याशाखांच्या प्रत्येकी एका व्यक्तीस व्यवस्थापन परिषदेवर निवडून देण्यासाठी निवडणूक.

१) कला, ललित कला व प्रयोगजिवी कला विद्याशाखा.
२) विज्ञान विद्याशाखा
३) शिक्षणशास्त्र विद्याशाखा.

या संदर्भात महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतूद खालीलप्रमाणे आहे.

**कलम २७(१)(एन)** Three persons elected by the Academic Council from amongst its members as prescribed by statute.
Provided that not more than one person shall be from one faculty as prescribed by the Statutes.

**सदर निवडणूक कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील**

| अ.क्र. | तपशील | तारीख, वार व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| १ | उमेदवारी अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख, वार व वेळ (परिनियम ३६८) | सोमवार, दि. २३ मे, २०११ दुपारी ४.०० वाजेपर्यत | निवडणूक विभाग, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र इमारत, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७ |
| २ | उमेदवारी अर्जाच्या छाननीची तारीख, वार व वेळ (परिनियम ३७१) | सोमवार, दि. २३ मे , २०११ सायंकाळी ५.०० वाजता. | निवडणूक विभाग, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र इमारत, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७ |
| ३ | उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख, वार व वेळ (परिनियम ३७०, ३७५) | गुरुवार, दि. २६ मे, २०११ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत | निवडणूक विभाग, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र इमारत, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७ |
| ४ | निवडणूकीची तारीख, वार व वेळ (परिनियम ३६६ व ३७३ सी) | शुक्रवार, दि. ३ जून, २०११ दुपारी १२.०० ते १.०० | संत नामदेव सभागृह, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७ |
| ५ | मतमोजणी | शुक्रवार, दि. ३ जून, २०११ (मतदान संपल्यानंतर लगेचच.) | संत नामदेव सभागृह, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७ |

**(टीप : वर नमूद केलेल्या वेळेतच मतदान करता येईल.)**

१) परिनियम ३७३(सी) मधील तरतूदीनुसार वर उल्लेख केलेली निवडणूक विद्यापरिषदेच्या शुक्रवार, दिनांक ३ जून, २०११ रोजी होणा-या सभेत होईल.

२) विद्यापरिषदेच्या सदस्य मतदार यादीतील मतदार सदस्यांनाच या निवडणुकीत भाग घेता येईल. उमेदवारी अर्जासोबत शिक्षक मान्यता पत्राची साक्षांकित प्रत व विद्यापीठ शिक्षकांनी नेमणूक पत्राची साक्षांकित प्रत जोडावी.

३) तदर्थ अभ्यास मंडळाच्या अध्यक्षांना या निवडणुकीच्या प्रक्रियेत उमेदवार अथवा मतदार म्हणून सहभागी होता येणार नाही.

3 faculty members in Academic council on Management

४) उमेदवारी अर्ज व उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून सदर अर्ज डाऊनलोड करून घ्यावा आणि उमेदवारी अर्ज सादर करतेवेळी अर्जाची किंमत रु. १००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) व उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज सादर करतेवेळी अर्जाची किंमत रु. १०/- (अक्षरी रुपये दहा फक्त) रोख स्वरुपात निवडणूक विभाग, पुणे विद्यापीठ येथे जमा करावी.

५) मतदार यादीतील कोणतेही दोन सदस्य मतदार, यादीतील पात्र उमेदवारास सूचित किंवा अनुमोदित करू शकतात. (परिनियम ३६७)

६) योग्य रितीने भरलेले आणि विहित वेळेपूर्वी दाखल केलेले उमेदवारी अर्जच विचारात घेतले जातील. (परिनियम ३६९ )

७) उमेदवारी मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा अधिक उमेदवार नसतील तर हे उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर करण्यात येईल. (परिनियम ३७२)

८) उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा उमेदवारांची अंतिम यादी सभेपूर्वी चार दिवस अगोदर जाहीर करण्यात येईल. (परिनियम ३८०)

९) विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाची किंवा मंडळाची प्रत्येक निवडणूक प्रमाणशीर, प्रतिनिधीत्व पध्दतीनुसार, एकक संक्रमणीय मतानुसार परिनियमाव्दारे विहित केल्याप्रमाणे घेण्यात येईल.

१०) मतदाराने मतदानाच्या वेळी स्वतःचा फोटो असलेले ओळखपत्र उदा. वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हींग लायसेन्स) किंवा ते ज्या संस्थेत सेवेत आहेत तेथील नियोक्त्याचे ओळखपत्र किंवा सर्वसाधारण (जनरल) निवडणुकीसाठी सक्षम प्राधिका-याने दिलेले ओळखपत्र, प्राप्तीकर टॅक्स कार्यालयाने दिलेले पॅनकार्ड किंवा तत्सम ओळखपत्र दाखविल्याशिवाय त्यांना मतपत्रिका मिळणार नाही.

११) अर्ज छाननी, मतदान आणि मतमोजणीच्या वेळी स्वतः उमेदवार किंवा त्याने लेखी पत्राव्दारे प्राधिकृत केलेला त्याच मतदार यादीतील त्यांचा एक प्रतिनिधी वेळेपूर्वी किमान अर्धा तास अगोदर पूर्वसूचना देऊन हजर राहू शकतो. (परिनियम ३७१ व ३८२)

१२) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १४ सप्टेंबर, २००९ व त्या संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेली महाराष्ट्र शासन व पुणे विद्यापीठाची परिपत्रके/पत्रे यांच्या अन्वये विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकार मंडळावर निवडून येण्यासाठी/नामनिर्देशित होण्यासाठी शासनाने विहित केलेल्या पात्रता शर्ती पूर्ण करणाऱ्या उमेदवारांचेच नामनिर्देशन अर्ज ग्राह्य धरण्यात येतील.

१३) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम ४५ अन्वये व्यवस्थापन परिषदेवर निवडून येणारी व्यक्ती सलग दुसऱ्या सत्रास पात्र असणार नाही.

गणेशखिंड, पुणे ४११००७
संदर्भ क्र. पुविनि/ २८४
दिनांक : १३ मे, २०११

मा. कुलगुरू यांच्या आदेशावरुन

( डॉ. मा. ल. जाधव)
**कुलसचिव**

**प्रति : मतदार सदस्य.**

3 faculty members in Academic council on Management